## नियमित दिवाणी दावा क्र. ८२/२०२० मधील
## निशाणी ८६ खालील आदेश

### इंद्रजित आप्पासो सुर्यवंशी विरुध्द महाराष्ट्र शासन

प्रस्तुतचा अर्ज वादींनी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ नुसार दावा दुरुस्तीसाठी दाखल केलेला आहे.

२. वादींचे कथन असे की, दावा मिळकत प्रतिवादी क्र. ८ च्या पूर्वहक्कदारांकडून प्रतिवादी क्र. १ ते ४ यांनी वारणा धरणग्रस्त पुनर्वसन कायद्याखाली संपातिद केलेली होती. संपादनाची प्रक्रिया सन १९७६ साली झालेली आहे. याबाबत निशाणी ७५ अ.क्र. ६ ला प्रतिवादी क्र. ४ यांनी उपआयुक्त पुनर्वसन, पुणे यांचेकडे दि. २३.०६.२०११ रोजी पाठवलेल्या रिपोर्टमध्ये कथन केलेले आहे. तो मजकूर परिच्छेद क्र. २ नंतर २अ म्हणून समाविष्ट करणेत यावा. सदरचा मजकूर खालीलप्रमाणे –

> **२अ– प्रतिवादी क्र. १ यांनी वारणा पाटबंधारे प्रकल्पाच्या लाभ क्षेत्रातील महाराष्ट्र प्रकल्प बाधित व्यक्तीचे पुनर्वसन अधिनियिम १९७६ कलम ११(१) ची अधिसुचना दि. १३.०५.१९७७ रोजी प्रसिध्द करणेत आलेली होती. त्या दिवशी प्रतिवादी क्र. ८ चे पूर्वहक्कदार रामचंद्र बाळा पवार यांचे खाते न. ३९३ वर ३ हे. ८१ आर धारण क्षेत्र होते. या क्षेत्रावर ० हे. ५७ आर स्लॅब आकारुन गट नं. ९१७ (नवीन गट नं.४९६/२) पैकी ५७ आर जमीन संपादन सन १९७७ साली करणेत आलेली होती. विशेष भूमी संपादन अधिकारी क्र. ९ प्रतिवादी क्र. ४ यांनी त्यांचेकडील एसआर नं./३०४/८८ हा निवाडा दि. १९.०८.१९८८ रोजी जाहीर होवून दावा मिळकतीचा ताबा फे.नं.६२९६ ने दि. १५.०४.१९८९ रोजी घेतलेला होता. दावा मिळकत प्रतिवादी क्र. ४ यांनी प्रतिवादी क्र. ९ ते ११ चे पूर्वहक्कदार विठोबा भागोजी कानडे यांना दिलेला होता. प्रस्तुत कब्जा हा कब्जेपट्टीने दिलेला असल्यामुळे त्यांची दावा मिळकतीच्या सातबारा पत्रकी फे.नं. ६३२० ने दि. ०६.०६.१९८७ रोजी वाटप केलेली होती. तेव्हापासून ते वादी यांना जमीन विक्री करेपर्यंत प्रतिवादी क्र. ९ ते ११ यांच्या पूर्वहक्कदारांचा व त्यानंतर त्यांचा व खरेदीपत्रानंतर वादी यांचा कब्जा होता व आहे.**
>
> **असे असता प्रतिवादी क्र. ४ यांनी पुन्हा दि. ३०.११.१९८२ असे असता प्रतिवादी क्र. ४ यांनी तत्कालीन पुनर्वसन अधिकारी यांनी नागठाणे गावात बेकायदेशीर पणे दावा मिळकतीबाबत कलम ११ (१) ची अधिसूचना दि. ३०.११.१९८२ रोजी जाहीर केलेली होती व प्रस्तुत संपादनाच्या प्रक्रियेच्या अगोदर प्रतिवादी क्र. ८ च्या पूर्वहक्कदारांनी खाते क्र. ३९३ वर स्लॅब बसत नाही असा आदेश दिलेला आहे, तो पूर्णपणे बेकायदेशीर आहे. ''**

३. प्रस्तुत अर्जास प्रतिवादी क्र. ८/१ ते ८/४ यांनी निशाी ८७ वर त्यांचे म्हणणे दाखल करुन विरोध दर्शवला आहे. त्यांचे असे कथन आहे की, संपादनाची प्रक्रिया १९७६ साली झाली असून दावा २०१९ मध्ये म्हणजे तब्बल ४३ वर्षांनी दाखल झालेला आहे. खरेदीपत्र दि. ०२.०८.२००७ रोजीचे आहे. त्यानंतर १२ वर्षांनी वादीने सन २०१९ मध्ये दावा दाखल केलेला आहे. वाद मिळकतीसंदर्भात यापूर्वीपासून २००१ पासून महसुली प्रकरणे चालू आहेत. त्याबाबत कोणतीही शहानिशा न करता वादीने बेकायदेशीर व्यवहार केलेला दिसून येतो. वादींनी मागणी केलेली दुरुस्ती प्रतिवादी क्र. १ ते ४ यांच्या कैफियतीस अनुसरुन केलेली आहे. प्रतिवादी क्र. १ ते ४ यांनी त्यांचे म्हणणे शासकीय कागदपत्रांचया आधारे केलेले असून ते वादीच्या विरोधात असल्यामुळे ते खोडून काढण्यासाठी वादी दुरुस्ती मागत आहेत. सबब, अर्ज खर्चासह रद्द करणेत यावा, अशी विनंती केलेली आहे.

४. अर्ज व म्हणणे वाचले. दोन्ही विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

५. दावा व सदर अर्जाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, वादीने सदरचा दावा निरंतर मनाई हुकूम मिळणेसाठी दाखल केलेला आहे. वादीची संभाव्य दुरुस्ती परिच्छेद क्र. २अ समाविष्ट होवून मिळणेबाबतची आहे. वादीने संपादनासंदर्भात दावा कलम २ मध्ये नमूद केलेले आहे. त्याचप्रमाणे दावा कलम ३ मध्ये संपादनासंदर्भात नमूद केलेले आहे. त्यामुळे आजरोजी वादी नवीन तथ्य संभाव्य दुरुस्तीनुसार आणत आहे, असे दिसून येत नाही. याउपरही संपादनासंदर्भात मुदतीचा कायद्याची बाधा येत असेल तर याबाबत मुद्दा काढून गुणदोषावर सोडवणेस मदत होणार आहे. हे वादग्रस्त नाही की वादीने प्रस्तुतचा अर्ज उशीरा आणला आहे. त्यामुळे तो खर्च लावून मंजूर करणे योग्य ठरेल. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आ दे श

१. सदरचा अर्ज र.रु. २००/– खर्च लावून मंजूर करणेत येतो.

२. वादींनी अर्जात मागणी केल्याप्रमाणे दावा कलम २ नंतर २अ समाविष्ट करुन तशी दुरुस्त प्रत १४ दिवसांत दाखल करणेची आहे.

IRFAN RHEMAN SHAIKH
Digitally signed by IRFAN RHEMAN SHAIKH
Date: 2025.01.18 15:58:53 +0530

**विटा.** **(आय.आर.शेख)**
**दि. १८.०१.२०२५** **दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, विटा**